ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 6.471
Publication Date: 30/09/2023

DOIs:10.2018/SS/202309005 --:-- Research Paper / Article / Review

# आधुनिक भारताच्या निर्मितीत राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक योगदान

**डॉ. माधुरी प्र. पाटील**
**सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख**
**एल. ए. डी. अँड श्रीमती आर. पी. कॉलेज फॉर वूमन, नागपूर.**
Email - Mppatil.ngp@gmail.com

**सारांश :** "शिक्षणाशिवाय आमचा तरणोपाय नाही. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही. असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे' असे २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथील ११ वे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षीय भाषणातील हे विचार छत्रपती शाहू महाराज यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवून त्यांनी इ.स. १९१७ ला आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते. हि योजना अमलात आणताना सर्वसामान्यांना ती जाचक होणार नाही याची काळजी घेतली. शाहू महाराज उदारमतवादी शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुधारणा घडवून आणावयाची होती . समाजातील विषमता नष्ट करून समाज जीवन समान करावयाचे होते. त्यासाठी त्यांना शिक्षणातून समग्र क्रांती घडवून आणावयाची होती. आपल्या प्रजेला राजकीय अधिकार देऊन त्यांना प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून घ्यावयाचे होते अपेक्षित सामाजिक क्रांती घडवून आणण्याकरिता व बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण प्रसारचे महत्व त्यांनी ओळखून वरील कायदा केला. विविधप्रकारच्या शिक्षण- प्रशिक्षण संस्थांची स्थापना करून नवनवीन अभ्यासक्रमाची सुरवात केली. विविध जाती -जमाती च्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे स्थापन करून बहुजन समाजाला शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर केल्या. त्यांच्यात शिक्षणाबाबत असलेली अनास्था दूर करून जागृती घडवून आणली. इतकेच नव्हे तर कोल्हापूर संस्थानाबाहेरील विविध प्रकारच्या शिक्षण संस्थांना आर्थिक व इतर मदत केली. छत्रपती शाहू महाराज यांनी निर्धारपूर्वक अमलात आणलेल्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्या कारकिर्दीतच ब्राम्हणेतर व अस्पृश्य समाजातील विद्यार्थांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.अशाप्रकारे शाहू महाराजांच्या ध्येयवादी व दूरदृष्टिकोनातून केलेल्या शिक्षण कार्याच्या प्रयत्नामुळे शिक्षणाचा प्रसार होऊन सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस चालना मिळाली. संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेवर विशेषतः बहुजन समाजावर त्याचा मोठा प्रभाव पडून त्यातून आधुनिक महाराष्ट्राची जडण घडण होण्यास व प्रगतीकडे मार्गक्रमण होण्यास सुरवात झाली.

**मूल शब्द:** शाहू महाराज, शैक्षणिक कार्य, कोल्हापूर संस्थान, बहुजन समाज.

## 1. प्रस्तावना:

इ. सन . १७५७ ला इंग्रजांनी बंगाल मध्ये इंग्रजी सत्तेची स्थापना करून इ.सन १८१८ पर्यंत जवळजवळ संपूर्ण भारत आपल्या नियंत्रणाखाली आणला होता . इंग्रजी सत्तेबरोबरच भारतात आधुनिक सुधारणेसही प्रारंभ होऊन भारतीयांच्या परंपरागत चालत आलेले धार्मिक, सामाजिक, आणि राजकीय विचाराला छेद देण्याचे कार्य या सत्तेच्या स्थापनेने केले. पाश्चिमात्य देशातील आधुनिकतेचे वारे भारतातही वाहून अज्ञान , अंधश्रद्धेचा विळख्यात गुरफटलेल्या भारतीय समाजाला आधुनिक, सुशिक्षित समाज निर्माण करण्याचे कार्य तत्कालीन अनेक समाजसुधारकांनी हाती घेतले. विशेषतः शतकानुशतके शिक्षणापासून वंचित असलेला बहुजन समाज त्यामध्ये शूद्र, अतिशूद्र महिला इ.चा समावेश होता त्याना शिक्षित करण्याचे कार्य या समाजसुधारकांनी हाती घेतले. परंतु शतकानुशतके चालत आलेल्या रूढी, परंपरा, चालीरीती यात बदल घडवून आणणे तितकेसे सोपे नव्हते. एकतर यामुळे वर्षानुवर्षे चालत आलेल विशिष्ट वर्गाच्या मक्तेदारीला आव्हान मिळाणार होते, सामाजिक चौकटीला आव्हान मिळणार होते. त्यामुळे याला विरोध तर होणारच होता. परंतु या विरोधाची पर्वा न करता हा बदल घडून आणण्याचे कार्य अनेक महापुरुषांनी, थोर समाजसुधारकांनी केले.

त्यांचे हे योगदान न विसरणारे आहे. त्याच्या या प्रयत्नांमुळेच आज भारताची आधुनिकतेकडे वाटचाल सुरु आहे. या दृष्टीने कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा या सुधारणेमुळे महाराष्ट्राची तर पुरोगामीत्वाकडे वाटचाल झालीच इतकेच नव्हे तर त्यांना आदर्श मानून इतर सुधारकांनीही त्यांचा हा वारसा पुढे चालविला व देशाची वाटचाल आधुनिकतेकडे होऊ लागली.

इ. सन १८८४ साली राजर्षी शाहू महाराज दत्तक विधीने कोल्हापूरच्या गादीवर आले. परंतु खऱ्या अर्थाने त्यांनी इ. सन १८९४ साली कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. त्यावेळी त्यांचे वय केवळ वीस वर्षाचे होते. कायदा आणि त्याबरोबर राज्यकारभाराचे शिक्षण त्यांनी राजकोट आणि धारवाड या ठिकाणी घेतले होते. सर एस. फ्रेजर या इंग्रज शिक्षकाने त्यांचा वैचारिक पिंड घडविला. सन ११ जून १८८९ पासून त्यांच्या शिक्षणाला सुरवात झाली. प्रत्येक पावलागणिक त्यांना आधार देणारी, धीर देणारी त्यांचे व्यक्तिमत्व घडविणारे त्यांचे मार्गदर्शक म्हणजे सर स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर. अशाप्रकारे गुरू शिष्याचा सुरू झालेला हा प्रवास महाराजांच्या मृत्युपर्यंत सुरू होता.

शाहू महाराज यांच्या समोरील अडचणी :

राज्यकारभारांचे सुत्रे हाती घेतले तेंव्हा त्यांच्यासमोर अनेक प्रश्न उभे होते. शूद्र आणि अतिशूद्र म्हणून मानलेल्या अनेक जातीतील लोकांना अंधारातून प्रकाशाकडे कसे न्यावे? त्यांना सामाजिक व धार्मिक अधिकार कसे द्यावेत त्यांची आर्थिक परिस्थिती कशी सुधारावी त्यांचे जीवन सुखी समाधानी कसे करावे. कारण याप्रश्नाचा शोध घेतल्याशिवाय आणि त्यानुसार कृती केल्याशिवाय राज्याचा विकास होणार नाही याची जाणीव त्यांना होती.

सामान्य जनतेची सर्वांगीण प्रगती विविध मार्गाने पण शक्यतो लवकर साधावी हे ध्येय नजरेसमोर ठेवूनच त्यांनी निष्ठापूर्वक राज्यकारभार करण्यास प्रारंभ केला. त्यासाठी प्रशासन, शेती, उद्योग धंदे, आरोग्य, शिक्षण, इत्यादी क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा घडवून आणण्यास प्रारंभ केला.

## 2. शैक्षणिक सुधारणा :

समाजात असलेले अज्ञान, दारिद्रय , अंधश्रद्धा, विषमता, धार्मिक वर्चस्व या सर्व गोष्टीचे वर्चस्व नष्ट करावयाचे असेल तर शिक्षण आवश्यक आहे हे ओळखून शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील सुधारणांना विशेष प्राधान्य व अग्रक्रम दिला होता. कारण जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हाच पाया आहे हे सत्य त्यांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांना शिक्षणातून समग्र क्रांती घडवून आणावयाची होती, सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचे होते. त्याचबरोबर कोल्हापूर संस्थानातील आपल्या प्रजेला काही राजकीय अधिकार देऊन त्यांना प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून घ्यावे आणि शक्य तितक्या राजकीय स्वयंशासनाच्या पद्धतीचा प्रारंभ करावा अशी त्यांची इच्छा होती. आपल्या हिता संबंधी, ज्ञानी आणि जाणता असा, सतत जागृत समाज राहावा असे त्यांना वाटत होते. त्यासाठी प्रजा साक्षर होणे आवश्यक होते हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा घडवून आणण्याला प्राधान्य दिले. महात्मा फुले यांच्या शिक्षण कार्याची प्रेरणा घेऊन शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य उभे राहिले होते.

## 3. शिक्षण विषयक उपाय योजना व सुधारणा कार्यक्रम :

शाहू महाराज गादीवर आले तेव्हा कोल्हापूर संस्थानातील शिक्षण विषयक परिस्थिती अत्यंत असमाधानकारक व अन्यायपूर्ण होती. समाजातील विविध विभागांमध्ये शैक्षणिक दृष्ट्या प्रचंड तफावत होती. अल्पसंख्याक ब्राह्मण शिक्षित होता तर मोठ्या संख्येने असलेला ब्राह्मणेत्तर समाज निरक्षर होता. तेव्हा ही परिस्थिती बदलण्याचे आव्हान त्यांच्यासमोर होते. या आव्हानाला समर्थपणे तोंड देण्याचे कार्य त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत केले.

कोल्हापूर संस्थानात शिक्षण कार्य हाती घेण्यापूर्वी त्यांनी थोर समाज सुधारक महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, संस्कृत पंडित रामकृष्ण भंडारकर व मुंबई प्रांताचे शिक्षण संचालक मि. गाइल्स इत्यादी प्रतिष्ठित नेते व अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करून शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्या. वेळोवेळी त्यांनी काढलेले जाहीरनामे यातून त्यांनी केलेल्या उपाय योजना व त्याची निष्ठने केलेली अमलबजावणी दिसून येते.

काही महत्वपूर्ण सुधारणा पुढीलप्रमाणे :

- शिक्षण क्षेत्रातील एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन त्यात प्रगती सुचविण्यासाठी 'शिक्षण सुधारक समितीची' स्थापना केली.

- प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढविली. ज्या गावी शाळेस योग्य अशी देवळे, धर्मशाळा वगैरे इमारती असतील तेथे शाळा सुरु करणे.
- बहुजन समाजाच्या व गरीब घराण्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिक, नादाऱ्या इत्यादी स्वरूपात शैक्षणिक सवलती उपलब्ध करून दिल्यात.
- शाळांची निर्मिती, इमारतीची दुरुस्ती, देखभाल, उत्पन्न खर्च इत्यादी संबंधातील व्यवस्थेबाबत स्पष्ट नियम घालून देण्यात आले.
- शिक्षणावर होणाऱ्या वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी खास 'शिक्षण कर' बसविण्यात आला. संस्थानातील अधिकारी, जहागीरदार व सधन व्यक्ती यांच्यावर आणि प्रत्येक घरावर तो कर लावण्यात आला.
- गरीब विद्यार्थ्यांना ग्रंथ पुरविण्यासाठी ' पुस्तक- पेढी- योजना' आखण्यात आली.
- मुलांना लष्करी शिक्षण देण्याच्या हेतूने एक " इन्फन्ट्री स्कूल " सुरु केले.
- मुलांना तांत्रिक शिक्षण देण्याकरिता ' टेक्निकल इन्स्टिट्यूट' ची वाढ करण्यात आली.
- एवढेच नव्हे तर शिक्षकांना खास शिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन स्वतंत्र' शिक्षक प्रशिक्षण केंद्र' काढण्यात आले.
- हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशी पाठवण्यात आले.
- प्रत्येक गावात शाळा काढून ती सुस्थिर करण्यासाठी 'वतनदार शिक्षक' योजना १९१७ साली सुरू करण्यात आली. त्यातील अडचणी लक्षात घेऊन सन १९१७ ला तिच्या ऐवजी 'पगारी शिक्षक योजना' अमलात आणली.
- सर्वात महत्त्वाची व मूलगामी शैक्षणिक सुधारणा म्हणजे सप्टेंबर १९१७ साली त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

ही योजना प्रत्यक्ष अमलात आणताना सर्वसामान्य जनतेला ती जाचक होणार नाही याची खबरदारी त्यांनी घेतली होती. याविषयी त्यांनी काढलेले फर्मान पुढीलप्रमाणे ज्यामध्ये सर्वसामान्याना शिक्षण मिळाले पाहिजे, सर्व शिक्षित झाले पाहिजे अशीच तळमळ यात दिसून येते.

"संस्थानात शिक्षणास योग्य मुलाची यादी प्रसिद्ध करून 30 दिवसाच्या आत मुलांच्या आई-बाबांनी आपापली मुले शाळेत पाठवावी अशा यादीविरुद्ध कोणास अपील करावयाचे असल्यास त्यांनी 30 दिवसाच्या आत अपील करावे. ठरलेल्या तारखेपासून सात दिवसाच्या आत मुले जर शाळेत आली नाही तर अशा मुला - मुलींची नावे व पालकांची नावे त्या शाळेच्या हेडमास्तरांनी मामलेदार यास कळवावी. मामलेदाराने पालकांना अशा मुलांचे समन्स काढावे त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे म्हणणे संयुक्तिक न दिसल्यास प्रत्येक मुलाबद्दल एक रुपया दंड करावा हा दंड शाळेत येईपर्यंत प्रत्येक महिन्यास करावा. आई-वडिलांच्या निकडीच्या कामासाठी, शेती वगैरे कामासाठी मुलांच्या मदतीची जरुरी असल्यास पंधरा दिवस मुलास घरी ठेवता येईल पण त्याची सकारण दखलगिरी शाळा मास्तरांनी दिली पाहिजे. मुले हजर राहणेबाबत हेळसांड करू लागल्यास अशावेळी आई-बाबांचा दोष असल्यास दंड करावा".

त्यांच्या या जाहीरनामावरून समाजातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे मुख्य म्हणजे प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलाला शिक्षण घेण्याकरिता शाळेत पाठविले पाहिजे तेव्हाच शिक्षणाचा प्रसार होईल त्याकरिता त्यांनी आई-वडिलांना दंड होईल असे आपल्या जाहीरनामात म्हटले त्यांच्या या सक्तीच्या व मोफत शिक्षणामुळे समाजातील इतर वर्गाला शिक्षण घेता आले.

**4. विद्यार्थी वसतिगृह मोहीम:**

केवळ शिक्षण मोफत व सक्तीचे करूनच ते थांबले नाही तर विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी स्वतंत्र वसतिगृहे त्यांनी स्थापन केली. ग्रामीण भागापर्यंत उच्च शिक्षणासाठी सर्व सोयी सुविधा पोहचविणे तत्कालीन काळात अवघड होते. ग्रामीण भागातील हुशार, होतकरू, गरीब मुले दुय्यम व उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी वसतिगृहात्मक शिक्षणाची व्यवस्था केली. कारण खेड्यापाड्यातील गोरगरीब मुलांना कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी असल्या तरी राहण्याच्या व जेवणाच्या सुविधा अल्प खर्चात मिळत नसल्याने त्यांना याचा लाभ घेता येत नसे. त्यामुळे त्यांनी राज्यातील प्रमुख जातींच्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष प्राचारण करून त्यांना आपापल्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करण्यास प्रवृत्त केले. केवळ प्रोत्साहन देऊन ते थांबले नाही तर जागा, इमारत, पैसा, पुस्तके, अनुदान इत्यादी स्वरूपात त्यांना सहाय्य केले. त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने वीस वसतिगृहे सुरू करण्यात आली. उदा. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस, दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत विदयार्थी वसतिगृह,

मुस्लिम बोर्डिंग, ढोर-चांभार बोर्डिंग, नाभिक विदयार्थी वसतिगृह इ. या वसतिगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या जातीच्या मुलांसाठी ही वसतिगृहे असली तरी जातीभेदाची भावना विद्यार्थ्यांमध्ये बळकावू नये म्हणून इतर धर्मीयांची मुले एकत्र राहतील अशी व्यवस्था केलेली होती.
जसे व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग मध्ये मराठ्यांच्या विद्यार्थ्यांबरोबर मुस्लिम, कोळी, माळी, गवळी इत्यादी जातीच्या विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देण्यात आलेला होता.

शाहू महाराज्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यात वसतीगृहाचे योगदान महत्वाचे आहे. त्यांच्या या विद्यार्थी वसतिगृहाच्या स्थापने मागे विविध जातीने परस्पर प्रेमपूर्वक व एकीच्या भावनेने वागावे आणि प्रत्येक जातीने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा अशी भावना व अपेक्षा होती.

**5. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन:**

शिक्षणाने स्त्रियांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन ती स्वावलंबी बनण्यास मदत होते असे त्यांचे मत होते. त्यांनी स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. संस्थानात मुला मुलींच्या शाळा होत्या तरी पण त्यांनी खास मुलींच्या साठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी खास उत्तेजन दिले जात असे. मुलींच्या शिक्षणात शिक्षकांनी अधिक रस घ्यावा म्हणून मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर त्या शिक्षकांना खास 'इनाम' म्हणून बक्षिसी दिली जात असे.
प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष दिले होते.

मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी इ.स. १९१९ मध्ये एक हुकूम काढून त्या अन्वये स्त्रियांच्या राहण्या जेवणाची सर्व व्यवस्था दरबारा कडून मोफत केली जाणार होती. हुशार मुलींना पुढील शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबाराने खास शिष्यवृत्ती ठेवल्या होत्या. एवढेच नाही तर राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते.
त्यांच्या विधवा सुनेच्या शिक्षणाचा प्रसंग उद्भवला तेव्हा राज परिवाराचा कडवा विरोध धुडकावून इंदुमती देवींना शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला व अमलातही आणला.

**6. तंत्र, कला व व्यवसायभिमुख शैक्षणिक सुधारणा:**

शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणाचा देखील पाया आपल्या संस्थानात घातला होता सन १९०३ मध्ये त्यांनी कोल्हापुरात' ओब्रायन टेक्निकल स्कूल ची स्थापना केली. तेथे वेगवेगळ्या उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. याबरोबरच कलागृह, औद्योगिक स्कूलची स्थापना, दिल्ली दरबार पाटील शाळा, सत्यशोधक शाळा आणि तलाठी स्कूल ची स्थापना केली. व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळाले तरच समाजाची आर्थिक प्रगती होईल असे त्यांचे मत होते. पुढे 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर' सुरू झाल्यामुळे तर संस्थानातील लोकांना वेगवेगळे व्यावसायिक शिक्षण घेण्याची सुवर्णसंधीच मिळाली.

शाहू महाराजांनी शारीरिक शिक्षणालाही तेवढेच महत्व दिले. गावोगावी तालमी आखाडे स्थापन करण्यास मदत केली जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा, फरीगदगा, बरची, भाला, विटा, बाणा, जंबिया इ. चे शिक्षण तालमीत सुरू झाले. मल्लविद्या बरोबरच शस्त्र विद्येत गावोगावची तरुण पारंगत होतील याकरिता सैनिकी शाळा सुरु केल्या. त्यांनी कला व कलावंतांना प्रोत्साहन त्यांनी दिले होते.

**7. निष्कर्ष :**

सर्व सुधारणांची गुरुकिल्ली म्हणजे शिक्षण. शिक्षणाचे महत्व ओळखून छत्रपती शाहू महाराजानी कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या. विचारपूर्वक व दूरदर्शीपणाने धोरण आखून त्यांची निर्धारपूर्वक व कठोरपणाने अंमलबजावणी केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्यामुळे बहुजन समाजाची साक्षरतेची टक्केवारी वाढली. स्त्री शिक्षणा बाबतही त्यांनी उदार दृष्टिकोन अवलंबिलेला होता. मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी उत्तेजन दिले. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्याचबरोबर मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या तरतुदीमुळे त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला. प्रत्येक जातीच्या विद्यार्थांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. पारितोषिके, शिष्यवृत्या देऊन बहुजन समाजाच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्सहन दिले. तांत्रिक व व्यवसायभिमुख

शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची स्थापना केली. खेळाडू व कलावंत यांचा शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. त्यांनी घेतलेले परिश्रम व दाखविलेले धैर्य याचा बहुजन समाजावर परिणाम होऊन तो जागृत झाला. त्यामुळे घडवून आलेली सामाजिक प्रगती या गोष्टीचा महाराष्ट्रातील जनतेवर विशेष प्रभाव पडला. त्यांचे हे कार्य ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. एवढेच नाहीतर अशा तऱ्हेचे मूलभूत स्वरूपाचे शैक्षणिक कार्य बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आपल्या भागात आपणही करावे अशी प्रेरणा महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या नेत्यांमध्ये निर्माण होऊन महाराष्ट्राच्या विविध भागातील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी सामान्य जनतेत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापन केल्या. मागासलेल्या व दुर्गम प्रदेशातही शिक्षणाच्या सोयी व सवलती उपलब्ध करून दिल्यामुळे शाहू महाराजांच्या कार्याला मूर्त स्वरूप प्राप्त झाले.

**संदर्भ :**

१. पवार डॉ. जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ. कोल्हापूर : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००७
२. घोरमोडे के. यु . , घोरमोडे कला , शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य. नागपूर: विद्या प्रकाशन, २००६.
३. पवार डॉ. जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१८.
४. भगत रा. तु ., शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज. कोल्हापूर: सिध्दराज प्रकाशन, १९९९.